दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ४० वा गुरूवार दि.११ जुलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS


POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## महाराष्ट्रातील शांतता भंग करण्याचा विरोधी पक्षांचा कट; मंत्री शंभुराज देसाईंनी विरोधकांना सुनावलं



महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकारण चांगलेच तापले आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी संध्याकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली होती. पण या बैठकीवर विरोधकांनी बहिष्कार घातला. मविआला विश्वासात न घेतल्याने विरोधकांनी त्यावर बहिष्कार घातल्याचे म्हटले होते. मात्र, विरोधकांना राज्यात शांतता नांदू द्यायची नाही आणि आरक्षणाचा प्रश्न चिघळत ठेवायचा आहे, अशी जळजळीत टीका राज्याचे मंत्री शंभुराज देसाई यांनी केला.

विरोधी पक्षांना आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यापेक्षा, सामाजिक तेढ निर्माण करण्याला अधिक खतपाणी घालायचे असल्याचा आरोप सत्ताधारी आमदारांनी विधानसभेत केला. सरकारला असहकार्य करण्याची आडमुठी भूमिका विरोधकांनी घेतली आहे. मराठा, ओबीसीच्या आरक्षणाचा वाद चिघळत ठेवण्याचा विरोधकांचा मानस आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात राज्यातील महायुती सरकारने मराठा समजाला कायद्याच्या चौकटीत बसेल असे १० टक्के आरक्षण दिले आहे. हे आरक्षण देताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही याचीही काळजी घेण्यात आली आहे. मात्र मराठवाड्यातल्या काही नेत्यांनी ओबीसी आरक्षणातूनच मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी लावून धरल्याने राज्यात गोंधळ निर्माण झाला आहे. या प्रश्नी दोन्ही समाजात सौहार्दाचे वातावरण कायम राहावे ही सरकारची भूमिका आहे. मात्र या भूमिकेला तडा देण्याचे काम विरोधक करत आहेत, असा आरोप सत्ताधाऱ्यांनी केला.

महायुती सरकारने बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला महविकास आघाडीतील तिन्ही प्रमुख विरोधी पक्षांनी दांडी मारली. यामागे त्यांचा उद्देश काय आहे? सर्वपक्षीय बैठकीचे महाविकास आघाडीतील सर्वच प्रमुख नेत्यांना लेखी निमंत्रण देण्यात आले होते. त्याचबरोबर संबधित विभागाकडून या नेत्यांना फोनद्वारे बैठकीची माहिती देण्यात आली होती. ज्यांना मुंबईत येणे शक्य नाही, अशांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सची सुविधा उपलब्ध करण्यात आली. मात्र संध्याकाळी सहा वाजता विरोधकांनी निरोप दिला की बैठकीला येणार नाही. यावरुन विरोधकांची दुटप्पी भूमिका दिसून येते, असेही शंभुराज देसाईंनी स्पष्ट केले.

## मुंबई–गोवा महामार्गावर ३ दिवसांचा ब्लॉक



कोलाड जवळील पुई येथे म्हैसदरा नवीन पुलाचे गर्डर बसवण्यचे काम होणार आहे. त्यामुळे मुंबई–गोवा महामार्गावर ११ जुलै ते १३ जुलै दरम्यान सकाळी ६ ते ८ आणि दुपारी २ ते ४ या दोन सत्रात ब्लॉक घेतला जाणार आहे. या कालावधीत मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या प्रवाशांसाठी पर्यायी मार्ग देण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे.यामध्ये वाकण फाटा येथून भिसे खिंड–रोहा–कालाड मार्गे पुन्हा मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ करता येईल. वाकण फाटा येथून पाली–रवाळजे–कोलाड किंवा पाली–रवाळजे–निजामपूर–माणगांव वरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ करता येईल. खोपोली–पाली–वाकण राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना पाली–रवाळजे–कोलाड किंवा पाली–रवाळजे–निजामपूर–माणगांव वरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ करता येईल. या कालावधीत गोव्याहून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसाठी पर्यायी मार्ग पुढीलप्रमाणे...१) कोलाड येथून कालाड–रोहा–भिसे खिंड–वाकण फाटा किंवा नागोठणे वरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ करता येईल.२) कोलाड येथून रवाळजे–पाली वरून वळवून वाकण–पाली–खोपोली राष्ट्रीय महामार्गावरून मार्गस्थ करता येईल.३) कोलाड येथून रवाळजे–पाली–वाकण फाटा वरून वळवून मुंबई–गोवा महामार्गावरून मार्गस्थ करता येईल.सर्व प्रवाशांनी या कालावधीत पर्यायी मार्ग वापरुन प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.




अनिल बनसोडे यांची बी एस एन एल च्या जनरल मॅनेजर पदी पदोन्नती झाल्याबद्दल माजी नगरसेवक अनिल गायकवाड, प्रसन्नजीत सरवदे, राहुल डोमणे यांनी शाल, पुष्पहार घालून सत्कार केला.

## लातूर - जाहीराबाद महामार्गाच्या निकृष्ट कामाची चौकशी करावी - आ. अमित देशमुख यांची विधानसभेत मगाणी



लातुर / प्रतिनिधी : – महाराष्ट्र – कर्नाटक या दोन राज्याला जोडणाऱ्या लातूर – जाहीराबाद महामार्गाचे काम निकृष्ट झाले आहे. त्याची चौकशी करावी, या महामार्गावर पडलेल्या भेगा त्वरीत दुरुस्त कराव्यात, महामार्ग बांधतांना पाण्याचा निचरा होणाऱ्या व्यवस्था उभाराव्यात त्याच बरोबर महामार्गावर उभारण्यात आलेली प्रकाश व्यवस्था नियमीत सुरु राहण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या चर्चेत केली आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात राज्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या संदभार्ने चर्चा सुरु असतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग बांधत असतांना आजूबाजूचा पाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था उभारल्या जात नसल्यामुळे अनेक ठिकाणी समस्या निर्माण झाल्या आहेत. लातूर शहराच्या बाजूनी महामार्ग गेले असल्याने या ठिकाणी पाण्याच्या निचऱ्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्याच बरोबर राष्ट्रीय महामार्ग बांधतांना तो शहर किंवा गावामधून जातो तेव्हा तेथे प्रकाश व्यवस्था उभारली जाते मात्र ही प्रकाश व्यवस्था नियमीत सुरु राहत नाही. त्यामुळे अपघात व इतर समस्या निर्माण होतात. या संदर्भात राज्याचे सार्वजनीक बांधकाम मंत्र्यांनी केंद्रिय यंत्रणे सोबत समन्वय सांधून धोरणात्मक निर्णयाव्दारे या समस्या दूर करणे आवश्यक आहे. केंद्रिय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांच्या कामाबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. मात्र राज्यात राष्ट्रीय महामार्ग बांधतांना त्याच्या गुणवत्ते बाबत तक्रारी येत आहेत ही वस्तुस्थिती आहे. यातील महाराष्ट्र – कर्नाटक या दोन राज्याला जोडणाऱ्या लातूर – जाहीराबाद महामार्गाचे काम निकृष्ट झाले आहे हे स्पष्टपणाने जाण्वत आहे. रस्त्यावर मोठमोठया भेगा पडल्याने दररोज अपघात घडत आहेत. या संदर्भात नुकतेच आंदोलनही झाले आहे. त्यासंदर्भात चौकशी होणे आवश्यक आहे. लातुरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी तेथे भेट घेऊन पाहणीही केली आहे. त्यांच्या पातळीवर ते या संदर्भात पाठपूरावा करतील परंतू राज्यातील राष्ट्रीय महामार्गचे काम दर्जेदार होण्याच्या दृष्टीने राज्याच्या सार्वजनीक बांधकाम विभागाने लक्ष देण्याचे गरजेचे असल्याचे आमदार देशमुख यांनी यावेळी म्हटले आहे. लातूर जहीराबाद महामार्गाच्या निकृष्ट कामाचा विषय गांभीर्याने घेऊ लातूर जाहीराबाद राष्ट्रीय महामार्गाच्या निकृष्ट कामांचा विषय गार्भीयाने घेऊन त्या बाबत कार्यवाही केली जाईल. त्याच बरोबर राष्ट्रीय महामार्गावर प्रकाश व्यवस्था व पाण्याचा निचरा व्यवस्थितरीत्या होण्याच्यादृष्टीने संबंधीत यंत्रणेसोबत संपर्क करुन धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही सार्वजनीक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण या प्रसंगी बांलतांना दिली.

## नागपूर फ्लाइंग क्लब' वर कारवाई करा – डॉ. नितीन राऊत विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात; विधानसभेत उचलला मुद्दा



मुंबई / प्रतिनिधी :– महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (महाज्योती) नागपूर येथील फ्लाईंग क्लबद्वारे 'महाज्योती'च्या लाभार्थ्यांना व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण देण्यासाठी २६ फेब्रुवारी २०२१ ला करार केला होता. त्यानुसार २० विद्यार्थ्यांना व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण देण्यासाठी महाज्योतीमार्फत प्रशिक्षण शुल्क नागपूर फ्लाईंग क्लब ला उपलब्ध करून दिले होते. सामंजस्य करारानुसार प्रशिक्षण देण्याची संपूर्ण जबाबदारी ही नागपूर फ्लाईंग क्लब या संस्थेची होती. फ्लाईंग क्लब द्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण न दिल्याने विद्यार्थी–विद्यार्थिनींचे उंच आकाशात विमान उडविण्याचे स्वप्न भंग पावले असल्याने नागपूर फ्लाईंग क्लबवर कारवाई करण्याची मागणी राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सभागृहात केली.

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या वैमानिक प्रशिक्षण योजनेंतर्गत विमान उड्डाणाचे प्रशिक्षण सत्र एप्रिल, २०२४ मध्ये पूर्ण झाले असून या सत्रातील विद्यार्थ्यांना नागपूर फ्लाइंग क्लबने आवश्यक असलेले २०० तासांचे पायलट प्रशिक्षण देण्यात आले नसल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. या योजनेचे कंत्राट महाज्योतीद्वारे नागपूर फ्लाइंग क्लबला देण्यात आले होते. याकरिता प्रती प्रशिक्षणार्थी तब्बल २५ लाख रूपये प्रशिक्षण शुल्क महाज्योतीकडून फ्लाइंग क्लबला अदा करण्यात आले असून प्रशिक्षणार्थींना १० हजार रूपये प्रती महिना विद्यावेतनाची ही तरतूद केली गेली असल्याचे यावेळी डॉ. राऊत यांनी सांगितले.

फ्लाइंग क्लबकडून पायलट प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले २०० तासांचे विमान उड्डाण प्रशिक्षण अद्याप सुरूच झाले नाही, तसेच या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक तसेच, शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकरिता प्रशिक्षणासह विद्यावेतन सुरू करावे, अशी मागणी यावेळी डॉ. राऊत यांनी शासनाला केली.

या प्रकरणी ३० ऑक्टोंबर २०२३ रोजी महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक आणि नागपूर फ्लाइंग क्लबचे मुख्य वैमानिक प्रशिक्षक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रशिक्षणाचा कालबद्ध कार्यक्रम राबविण्याबाबत व विद्यार्थ्यांच्या सर्व समस्यांचे निवारण करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, नागपूर फ्लाईंग क्लब, नागपूर यांनी विद्यार्थ्यांना आश्वस्त केलेले होते. तरी देखील अद्यापही कोणतीही सकारात्मक कार्यवाही करण्यात आली नसल्याने वैमानिक प्रशिक्षण इच्छुकांचे भविष्य विद्यमान सरकारने धोक्यात आणले असल्याची टिका डॉ. राऊत यांनी केली.

## कार्यकर्त्यांची जाणीव असणारा जाणता लोकनेता केंद्रीय मंत्री रामदास आठवले



मुंबई :– रिपब्लिकन पक्षाचे जुने जाणते ज्येष्ठ कार्यकर्ते कालकथित राजकुमार यशवंत कांबळे यांच्या निवासस्थानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज चेंबूर पी एल लोखंडे मार्ग येथे भरपावसात चिखलातून वाट काढत भेट देऊन कांबळे कुटुंबीयांचे सांत्वन केले. कार्यकर्त्यांच्या सुखदुःखात धावून जाणारे रामदास आठवले हे जाणीव असणारे लोकनेते आहेत याची प्रचिती आज चेंबूर मध्ये लोकांना आली.

भरपावसात भिजत चिखलातून वाट काढत आपल्या दिवंगत कार्यकर्त्याच्या शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी ना.रामदास आठवले चेंबूर च्या पी एल लोखंडे मार्गावर चालताना ज्यांनी ज्यांनी पहिले त्यांनी त्यांनी रामदास आठवले यांच्या सहृदयता आपुलकी आणि कार्यकर्त्यांबद्दलच्या जाणीव ठेवणाऱ्या त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्याला मनापासून सलाम केला.

## पीक विमा अर्ज भरण्यासाठी हा जिल्हा अव्वल! राज्याच्या तुलनेत १२ टक्के सहभाग

राज्य सरकारने यंदाही एक रूपयांत पीक विमा योजना लागू केली असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तर आत्तापर्यंत ९७ लाख २९ हजार शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी अर्ज भरल्याची माहिती कृषी विभागाच्या आकडेवारीतून समोर आली आहे.

तर अजून ६० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा अर्ज भरणे बाकी आहे.

दरम्यान, राज्यातील छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत जास्त शेतकऱ्यांनी पिकविम्यासाठी अर्ज केला आहे. तर जिल्हानिहाय विचार केला तर सर्वांत जास्त पिकविम्यासाठी अर्ज हे बीड जिल्ह्यातून आले आहेत. एकूण अर्जाच्या तुलनेत १२ टक्के अर्ज हे बीड जिल्ह्यातून आले असून येथील १२ लाख ११ हजार २२१ शेतकऱ्यांनी पीक विम्यासाठी अर्ज केले आहेत. येथील पीक विमा संरक्षित क्षेत्र हे ५ लाख १९ हजार हेक्टर असून विमा संरक्षित रक्कम २ हजार ६७४ कोटी रूपयांची आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात राज्यातील सर्वांत जास्त म्हणजे २७ टक्के शेतकऱ्यांनी अर्ज केला आहे. या विभागात २६ लाख ६० हजार ७४९ शेतकऱ्यांनी पिकविम्यासाठी अर्ज केला आहे. या विभागातील पीक विमा संरक्षित क्षेत्र हे १२ लाख ५२ हजार हेक्टर असून विमा संरक्षित रक्कम ६ हजार २८८ कोटी रूपयांची आहे.

कोणत्या विभागात किती शेतकऱ्यांनी केला अर्ज

कोकण विभाग – ६२ हजार ९२१

नाशिक विभाग – ६ लाख २३ हजार ८९२ पुणे विभाग – १२ लाख ३ हजार ३२३ कोल्हापूर विभाग – २ लाख ६५ हजार ९७९

छत्रपती संभाजीनगर विभाग – २६ लाख ६० हजार ७४९

लातूर विभाग – २६ लाख ६१ हजार ७९१अमरावती विभाग – १६ लाख ५७ हजार ५२४ नागपूर विभाग – ५ लाख ९३ हजार ४७५

एकूण अर्ज – ९७ लाख २९ हजार ६५४

## रमाकांत पिडगे यांचा वाढदिवस पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन साजरा





लातूर:– लातूर शहर महानगरपालिकेचे प्रमुख स्वच्छता निरीक्षक धडाकेबाज, कर्तबगार रमाकांत पिडगे यांचा वाढदिवस , अशोक देडे जिल्हाध्यक्ष, अशोक हनवते जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन साजरा करण्यात आला. यावेळी उमाकांत धावारे, विनोद लोंढे, बाळासाहेब धोत्रे, बालाजी बंडगर, विजय जाधव, पवन गायकवाड आदी उपस्थित होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# समस्यांची मुसळधार!

पावसासारख्या नैसर्गिक प्रकोपाच्या वेळी आपली सर्व व्यवस्था कशी हतबल आणि केविलवाणी ठरते, याचे प्रत्यंतर महाराष्ट्रात वेळोवेळी आले आहे. सोमवारी याच गोष्टीचा अनुभव मुंबईसह महाराष्ट्राने ठिकठिकाणी घेतला. महानगर जलमय झाले. किल्ले रायगड भागात अतिवृष्टीमुळे तीनशेवर शिवभक्त अडकले. नंतर त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. ठाणे, रायगड, कोकणसह गोव्यात पूरस्थिती निर्माण झाली. कोल्हापूर जिल्ह्यात धरण क्षेत्रात मुसळधार सुरू आहे. विदर्भातील अकोला व बुलडाणा जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे नद्या–नाल्यांना पूर आला आणि ठिकठिकाणची वाहतूक ठप्प झाली. नागपूर शहरात गेल्या वर्षीप्रमाणे यावेळीही पावसामुळे अनेक घरांत पाणी शिरले आणि शहरवासीयांनी त्याबद्दल पालिकेला दोषी धरले. मागच्या वर्षी पाऊस कमी झाल्यामुळे मुंबईकर प्रवासी वाचले; परंतु परवाच्या पावसात सखल भागात पाणी साचले. काही तासांत २६० ते ३१५ मिलिमीटर पाऊस पडल्यामुळे शहराचे दळणवळण पुरते अस्ताव्यस्त झाले. काही ठिकाणी पंप बंद पडल्याने पाण्याचा उपसा होण्याचे काम थांबले. महालक्ष्मी एक्स्प्रेससह अनेक रेल्वेगाड्या खोळंबल्या. विधिमंडळाचे कामकाजही तहकूब करावे लागले. सामान्य जनतेचे अशा पावसात काय हाल होतात, याचा अनुभव खुद्द मंत्री आणि आमदारांना घ्यावा लागला. प्रशासनही पावसात अडकले. गेल्या वर्षी कर्जत तालुक्यात खालापूर तालुक्यात इरशाळवाडीवर दुःखाचा डोंगर कोसळला होता. पायथ्याशी असलेल्या आदिवासी बांधवांच्या वाडीवर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत १९ जणांचा मृत्यू झाला. अनेक घरे गाडली गेली. दुर्घटना घडलेले ठिकाण अतिदुर्गम भागात असल्याने, तिथे वाहने पोहोचू शकत नव्हती आणि पावसाचा जोर कायम राहिल्याने बचावकार्यात अडथळे आले. निसर्गाने २०१९ मध्येच इरशाळगडाला इशारा दिला होता, तरीही तेथील वाडी–वस्ती हलवण्याबाबत शासन यंत्रणेने वेळेवर निर्णय घेतला नाही आणि पुढचे संकट ओढवले. २०13 मध्ये पुण्यापासून ७५ ते ८० किलोमीटर अंतरावर डिंभे धरणाच्या परिसरातील आदिवासी भागात माळीण हे अवघे गावच डोंगराच्या कड्याखाली गडप झाले. ४४ घरे आणि एक शाळा गाडली गेली. दीडशेपेक्षा अधिक मृतदेह सापडले. एक गावच्या गाव काळाच्या उदरात नामशेष झाले. त्यावेळी पुण्याच्या भारतीय भूवैज्ञानिक पथकाने माळीण परिसराची पाहणी केल्यानंतर या दुर्घटनेमागे जमिनीचे सपाटीकरण आणि झालेली जंगलतोड हे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट झाले. २६ जुलै २००५च्या मुंबईमधील ढगफुटीच्या वेळी २४ तासांत ९४४ मिलिमीटर पाऊस पडला होता. जगात अशी घटना केवळ आठव्यांदा घडली होती. त्यावेळी एक हजारपेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला, तर ५०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तेचे नुकसान झाले. मुंबईच्या या महापुरामुळे १४ हजार लोक बेघर झाले होते. मिठी नदीच्या काठावरील बेकायदेशीर बांधकामांमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली. अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये म्हणून राज्य सरकार आणि महापालिकेने पात्रातील वा लगतची बांधकामे हटवणे, शहरात पडणारे पाणी समुद्रात व खाडीत सोडण्यासाठी नाल्यांची रुंदी व खोली वाढवणे, पंपिंग स्थानके उभारणे आदी प्रकल्प हाती घेतले. केल्या गेलेल्या उपाययोजना किती आणि कशा तोकड्या, कुचकामी आहेत, याची झलक मुंबईकरांनी आता नव्याने अनुभवली आहे. ही साइट त्रेसश्रश –वङ्शपीश जाहिरात इंटेंट लिंक वापरते. –वङ्शपीश या लिंक आपोआप जनरेट करते आणि त्या निर्मात्यांना पैसे कमवण्यात मदत करू शकतात. पर्यावरणतज्ज्ञ माधव चितळे समितीच्या शिफारशीनुसार, मुंबईत एकूण ८ ठिकाणी पावसाळी पाण्याच्या उपसा करणारी पंपिंग स्थानके बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. पर्जन्य जलवाहिन्यांची क्षमता दुपटीने वाढवली. फ्लडिंग स्पॉट मुक्त करण्यासाठी ८०० कोटी रुपये खर्च केले आहेत, अशी माहिती मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी दोन वर्षांपूर्वी दिली होती; परंतु त्यावेळीही मिठी नदीच्या रुंदीकरणाचे व सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले नसल्याचे स्पष्ट झाले होते. मुंबईतील पावसाळी पाण्याचा तातडीने निचरा करण्यासाठी १९९३ मध्ये 'ब्रिम्स्टोवॅड' प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला गेला. तरीही १२०० कोटी रुपये खर्च करूनही आणि त्यास तीस–तीस वर्षे लोटूनही हा प्रकल्प पूर्ण होऊ नये, हे धक्कादायक आहे. रेल्वे रुळांवर पाणी भरल्यास, पॉईंट मशिनमधील बिघाड टाळण्यासाठी अभिनव उपाय केल्याचे मध्य रेल्वेकडून सांगितले गेले. मायक्रो टनेलिंग, उच्च क्षमतेचे पंप आदी उपाययोजना केल्याचीही माहिती देण्यात आली होती. यावेळी पाणी तुंबणार नाही, शहर थांबणार नाही, असे दावे मुंबई महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाने केले होते; परंतु हे दावे तुफानी वर्षावात वाहून गेले. नालेसफाईची कामे पूर्ण झाल्याचा दावा राज्य शासन व मुंबई महानगरपालिका प्रशासनाने केला होता; परंतु तरीही कित्येक ठिकाणी पाणी साचल्यामुळे हे दावे पोकळ असल्याचे सिद्ध झाले. हिंदमाता, मीलन सबवे, अंधेरी व मालाड सबवे येथे नेहमीप्रमाणे पाणी साचणार नाही, असे पालिका सांगत राहिली; परंतु पाणी तरीही तुंबलेच. हिंदमाता परिसरात भूमिगत टाक्या बांधल्यामुळे पाणी साचणार नाही, असे सांगणारी पालिका तोंडावर आपटली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी होणारी अवैध बांधकामे, वाळूचा उपसा, राडारोडा कुठेही टाकून देण्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. मुळात पोलिस व प्रशासन व्यवस्थेवर कामाचा असह्य ताण आहे, कारण कर्मचारीच कमी आहेत. २०१९ आणि २१ मध्ये सांगली–कोल्हापुरात पुराने थैमान घातले.

# भाववाढ शेतकऱ्यांची आणि भांडवलदारांची? कामगार, शेतकरी मेला तरी चालेल उद्योगपती,पुजारी जगला पाहिजे

कृषिप्रधान देशात शेतकऱ्याच्या कांदा भाजीपाला भाववाढ झाली.की देशातील उच्च वर्णीय अर्थतज्ञ,साहित्यिक,संपादक आणि मनुवादी विचारांच्या संघटनाचे नेतृत्व करणारे नेते पेटून उठतात. सर्व वृतपत्रात त्यांच्या बातम्या लेख प्रसिद्ध होतात.आणि चॅनल मीडियावर त्यांच्या शेतकाऱ्याच्या भाववाढी बाबत चोवीस तास चर्चा घडवून आणल्या जातात.पण मोबाइल कंपन्यानी रिचार्ज डायरेक शंभर रुपये वाढविले त्या विरोधात राज्यात देशात कुठे ही आवाज नाही,की निषेध नाही.वृतपत्रात त्यांच्या निषेधाच्या बातम्या लेख प्रसिद्ध झाले नाहीत.आणि चॅनल मीडियावर भांडवलदारांच्या मोबाइल कंपन्याच्या रिचार्ज भाववाढीवर साधी बातमी नाही.या देशात सर्वच शेतकरी,कामगार,मजूर हिंदू आहेत.आणि मोबाइल वापरणारे सर्वच ग्राहक हिंदू आहेत. शेतकऱ्यांच्या भाववाढीवर बोलणारे,लिहाणारे मोबाइल कंपनीच्या रिचार्ज भाववाढी बाबत का लिहत नाही?.ही भारतातील आणि हिंदुस्थानतील विषमता बहुसंख्य हिंदूंना का दिसत नाही.

भारतीय कामगारंची आणि शेतकऱ्याची फार वाईट परिस्थिती आहे.आई जेवण घालत नाही.आणि बाप भीक मागु देत नाही.मायबाप सरकारच काय करावे याचा मोठ्ठा पेच पडलाय कामगारांना व शेतकऱ्यांना! काँग्रेस हे भांडवदाराचे सरकार आहे. ते गोरगरीब शेतकऱ्याला मजुरांना सुखाने जगू देत नाही.म्हणूनच यांना सत्तेतुन घालविल्या शिवाय शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार नाही.हे बेबीच्या देठा पासुन ओरडुन सांगणारे राज्यातील देवेन्द्र फडणवीस साहेब आणि देशभर शेपन्न इंच छाती फुगवुन सांगणारे नरेंद्र मोदी साहेब यांना आता काय कठीण वाटत आहे. ते देशातील तमाम कामगार कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांना समजण्या पलीकडे झाले आहे.तेव्हा काँग्रेस ही काही भाजप शिवसेने सारखी ज्वलंत हिंदुत्व वादी नव्हती. सर्वधर्म समभाव मानणारी होती.म्हणुन शेतकऱ्याची कृषीउत्पन्न बाजार समितीत हिंदुत्ववादी शेतकऱ्यांची प्रचंड लुटमारी होत होती.त्यामुळे शेतकऱ्यांच्या सोसायटी कर्जाचा डोंगर कमी होण्या ऐवजी वाढत होता.तेव्हा दुष्काळ जाहीर करण्यासाठी गर्वसे कहो म्हणणारे तालुका,जिल्हा सिंह गर्जना करून हालवून ठेवत होते.आता त्यांना मंदिराबाहेर हिंदुत्ववादी शेतकरी,कर्जबाजारी शेतकरी दिसत नाही.त्यामुळे दुष्काळ जाहीर करायचा प्रश्नच उद्भवत नाही.तेव्हा विहिरींना पाणी नव्हते.आता पाणीच पाणी आहे विहीरीला,तेव्हा लाईट नव्हती आणि लाईटबील मात्र वेळेवर येत होतो. आता भरपूर लाईट आहे.त्यामुळे लाईटबिल वेळच्या वेळेला येत नाही.तेव्हा काँग्रेस सह सर्वच पक्षाच्या नेत्यांचे डोळे फुटले होत.कान बहिरे झाले होते.त्यांची वाचा गेली होती.कारण त्यांनी ज्वलंत हिंदुत्ववादी कामगारंचे व शेतकऱ्यांचे कोणतेच दुःख दिसत नव्हते.तेव्हा राज्य व केंद्र साकारलं पाझर फुटत नव्हता. आताचे राज्य आणि केंद्र सरकार किती दयाळू आहे पहा. किती गरीब कष्टकरी उधोगपतीनां कर्ज माफ केले.विजय मल्ल्या सारख्या गरीब माणसाला नऊ हजार करोड रुपये कर्ज बुडवून परदेशात गेला.काही केले नाही सरकार आणखी किती संस्कारीत माणस सत्ताधारी पाहिजे.शेतकऱ्यांना कर्ज देतांना सातबारा आणि ओळखीचे दोन जामीनदार लागतात.तेव्हा बँक अधिकारी कर्ज पास करतात.मग विजय मल्ल्याला कर्ज देतांना कोणते कागद पत्र आणि जामीनदार घेतले?.ते ते सरकार आणि हे सरकार का नाही जाहीर करत?.हिंदुत्ववादी शेतकऱ्यांच्या थकबाकीची माहिती जामीनदारांच्या नांवासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन जनतेला सांगितल्या जाते.मग हया बँक अधिकाऱ्यांच्या गुणवंता, कर्तबदारीचे जाहीरपणे मूल्यमाफन का होत नाही.शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय आणि गरीब उधोगपतीनां कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा न्याय का?. कोणाची जात धर्म आडवा येतो?.तिथे ज्वलंत हिंदुत्व म्हणजे राष्ट्रीय लागु होत नाही काय?.

सरकारकडे पैसा नाही शेतकऱ्यांच्या कर्ज माफीला.पण भारतातील ४०० रेल्वे स्टेशन वर फ्री वाय फाय सेवा देण्यासाठी सरकारने गूगल सोबत साडेचार लाख कोटी रुपयांचा करार केला होता.शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला ७६ हजार कोटी नाहीत आणि वाय फाय साठी साडेचार लाख कोटी होते.माणसाला जगायला भाकरी पाहिजे कि वाय फाय ?.देशातील सर्व सरकारी नोकऱ्या हया नागरिकांची सेवा करण्यासाठी असतात.त्या उत्पादन करणाऱ्या कंपन्या,कारखाने नाहीत.तरी त्यांना दरवर्षी महागाई भत्ता आणि इतर सवलती मिळतात.त्यांच्या कर्मचाऱ्यां करीता सातवा वेतन आयोग लागु होते.मग शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव का नाही?. शेतकऱ्यांच्या पिकाला महागाईची झळ पोचत नाही काय?.शेतकऱ्यांना बि,बियाने औषध,शेतमजूर यांच्या करीता पैसा कुठून येणार?.कृषिविभागतील सर्व दुकानदार,व्यापारी,अडते, दलाल यांना सर्व महागाईची झळ लागते.कृषीउत्पन्न बाजार समितीच्या माथाडी कामगारांन कडून माथाडी बोर्ड चाळीस,एकेचालीस टक्के लेव्ही कापुन घेते. त्यांचा त्याकामगारांना कोणताही फायदा मिळत नाही. त्यावर सर्व कर्मचारी,पुढारी कायम स्वरूपी मलिदा खातात. शेतकऱ्यांना जात,धर्म,प्रांत नसतो. पण राजकीय पक्षांना त्यांच्या कार्यकर्ते,नेते यांना जात,धर्म,प्रांत असते.त्यावरच ते शेतकऱ्यांचे मतदान मिळवितात.तेव्हा त्यांना लाज कशी वाटत नाही.शेतकऱ्यांच्या मतदानावर निवडून यायला.ज्यांच्या मतदानावर निवडुन येतात आणि त्यांनाच सवलती देतांना हात मोडतात.पण कंपनी,कारखाने,बिल्डर्स यांचा टॅक्स माफ करतांना मेंदू आणि हात बरोबर काम करतात.



विरोधी पक्षात असतांना सत्तेच्या खुर्चीसाठी ओरडून सांगत होता,कामगार,कर्मचारी शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे.मग आता काय झालं तुमच्या डोक्यातील मेंदूला. आता त्यांची निर्णय क्षमता कोमात गेली काय?.हिंदुत्व,मराठी माणस,धार्मिक भावनिक साद घालून कामगार,कर्मचारी शेतकरी नेला स्वर्गात आणि सत्ता मिळविली.आघाडीचे सरकार एकमेकांना सारखे शिव्या शाप देत होते पण सत्ता सोडत नव्हते.ते कोणते ही हिंदुत्वाचे संस्कार नसलेले बोके होते.युतीच्या सरकारात तर पिवर हिंदुत्वाचे संस्कार झाले नेते आहेत.हे त्यांच्या पेक्षा जास्त भांडतात.पण कामगार,कर्मचारी शेतकऱ्यांना मराठी माणसांना न्याय देण्यासाठी सत्तेतुन बाहेर पडत नाही.म्हणुन आता शेतकऱ्यांना स्वर्गात जाण्याकरिता आत्महत्याच करण्याची पाळी आणली राज्यकर्त्यांनी.

शेतकऱ्यांची शेतजमीन विकास करण्यासाठी घेता आणि उधोगपतीनां कवडी मोलाचे देता.त्यात तुम्ही मरे पर्यंत कमिशन खाणार आणि चार पिढ्या बसुन खातीन एवढी संपत्ती गोळा करणार.शेतकऱ्यांची मुलं शेती गेल्यावर शहरात येऊन हाऊस पिकिंग किंवा वाचमन म्हणुन कायम असंघटीत कामगार म्हणुन काम करणार.या देशात देव देविका जागृत असत्या तर यांना त्यांनी कठोर शिक्षा केली असती.पण तेच भटा ब्राम्हणाच्या बौद्धिक कौशल्यामुळे दररोज बाजारात पांच रुपये किंमतीत विकल्या जात आहेत.हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व म्हणणारे कामगार,कर्मचारी शेतकऱ्यांना कोणत्याच गिनतीत घेत नाही.उच्च वर्णीय वर्गीय बँक अधिकारी शेतकऱ्यांच्या कर्ज माफीला जाहीर विरोध करण्याची हिंमत करतात.आणि हजारो कोटी रुपयाचे कर्ज बुडविणाऱ्या उच्च वर्णीय,वर्गीय उधोगपतीचे कर्ज माफीची जाहीर समर्थन करतात.म्हणजे कामगार,कर्मचारी शेतकरी मेला तरी चालेल उधोगपती जगला पाहिजे ही भूमिका घेतात.

कामगार,कर्मचारी शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे प्रामाणिक असते तर यांनी या अधिकाऱ्यांचे जगणे कठीण केले असते. आता कुठे आहेत.ते तोंडाला काळे फासणारे कट्टर हिंदुत्ववादी?.कुठे आहे त्यांचा मराठी धर्म?.पैसा सर्व श्रेष्ठ झाला आहे.धर्माचे संस्कार,नीतिमत्ता कुठेच शिल्लक राहिली नाही.आघाडी सरकार व युती सरकार नालायक होते.म्हणजे सरकार कोणाचे ही असो. कामगार आणि शेतकरी हा भरडला जाणार असेल तर त्यांनी काय केले पाहिजे.जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी म्हणजे शेतकरी आणि हितकरी,बहुजन हिताय बहुजन सुखाय असलाच पाहिजे.करीता शेतकऱ्यांनी महात्मा जोतीराव फुले यांचा आसुड हाती घेऊन कामगार,शेतकरी मेला तरी चालेल उधोगपती पुजारी जगला पाहिजे असे धोरण घेणाऱ्या ठेवणाऱ्यांना फोडून काढलेच पाहिजे.सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सर्वच कामगार शेतकऱ्यांना प्रार्थना करतो.भटा ब्राम्हणांच्या सांगण्या वरून देवाला प्रार्थना करणे सोडा!. जिवंत माणसाला कामगार शेतकऱ्यांना हात जोडून प्रार्थना करा.जात,धर्म सोडा.शेतीवर जगणाऱ्या सर्वच कामगार,कर्मचारी अधिकारी, शेतकरी माणसांना जोडा.

*******

सागर रामभाऊ तायडे,
भांडुप,मुंबई
९९२०४०३८५९.

# भाजपची 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'

रुपेरी पडद्यावरल्या मायावी जगासारखा माध्यमे समाजमाध्यमे आणि रेटून खोटे बोलणारे नेते व पाठीराखे यांचा व्यूहच भाजपने रचला आहे. निव्वळ कथानकवादावर हे राजकारण सुरू असून यांच्यावर आरोप करणे हाही याच राजकारणाचा भाग आहे पहिली बाजू' या सदरात 'असत्याची फॅक्टरी बंद पडेल' या शीर्षकाखाली भाजपचे महाराष्ट्राचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर असत्य बोलण्याची टीका केली आहे. त्याचा प्रतिवाद होणे राहुल गांधी हे काँग्रेसनेते आहेत म्हणूनच केवळ नव्हे, तर देशात गेले दशकभर चाललेल्या 'कथानकवादी' राजकारणाच्या व्यूहरचनेला रोखण्यासाठी गरजेचे आहे.

या कथानके रचणाऱ्या राजकारणापायीच, आदरणीय. राहुल गांधी यांना 'पप्पू' ठरविण्यासाठी समाजमाध्यमे/ माध्यमे यांद्वारे कोटी रुपये स्वाहा करून झाले ईडी, सीबीआय, आयकर खाते आदी तपास यंत्रणांचे भय दाखवून झाले. राहुलजींची भारत जोडो यात्रा, त्यानंतरची न्याय यात्रा यांना नावे ठेवण्याचा प्रकारही करून झाला. एकंदर, राहुलजी जे जे करतील त्या सर्वांमध्ये बाधा आणण्याचे प्रयत्न सत्ताधारी पक्षाने सत्ताधाऱ्यांच्या आशीर्वादाने केल्याचे दिसले. याचेच एक उदाहरण म्हणजे, ऐन निवडणुकीच्या काळात पक्षाच्या बँक खात्यांना सील करण्याचा– खाती गोठवण्याचा– प्रकार. गेल्या पाच वर्षांत पक्षातील मोठे नेते ईडी, सीबीआय, आयकर खात्यांचे भय दाखवून फोडून झाले तरीही काँग्रेस पक्षाचे खासदार दुप्पट झाले हे भाजपचे खरे दु:ख आहे. या वैषम्यातून केशव उपाध्ये यांचा उपरोक्त लेख आहे. मात्र राहुल गांधी यांच्यावर असत्यकथनाचा आरोप करण्यातून भाजप पुन्हा खोट्या कथानकांचा प्रचार करत आहे, हे उघड आहे.उदाहरणार्थ, अग्निवीर योजना. अवघे सहा महिने प्रशिक्षण घेतलेल्या कोवळ्या मुलांच्या हातात रायफल देऊन त्यांना चीन, पाकिस्तानच्या पाच–पाच वर्षे प्रशिक्षण घेतलेल्या फौजांपुढे उभे करायचे ही कसली योजना? यात मृत्युमुखी पडलेल्या युवकांना समाजमाध्यमांवर कोणीही 'हुतात्मा' म्हटले तरी, अधिकृतरीत्या त्यांना शहीद/ हुतात्मा हा दर्जा नाही (शहीद जवानांच्या कुटुंबीयांना मिळणारे लाभ 'अग्निवीरां'च्या कुटुंबीयांना लागू होत नाहीत), त्यांना कँटिन नाही, त्यांना पेन्शन तर नाहीच नाही. कुटुंबीयांना अग्निवीराच्या दुर्दैवी मृत्यूनंतर जी काही रक्कम मिळते, त्यात मोठा वाटा विम्याच्या रकमेचा असतो. एवढी मोठी तफावत करणारी योजना काँग्रेस आणि इंडिया आघाडी सत्तेवर आल्यावर तात्काळ रद्द करणार आहे. शहीद अग्निवीर अजय कुमार ह्यांच्या विषयी आदरणीय राहुल गांधी यांनी 'एक्स'– पूर्वीचे ट्विटर या समाजमाध्यमावर २२ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या नोंदीत 'पेन्शन मिळणार नाही' असा स्पष्ट उल्लेख आहे, त्याबाबत देशाचे संरक्षणमंत्री आजतागायत गप्प आहेत. निवडणूक प्रचारात 'मंगळसूत्र', 'जादा बच्चे पैदा करनेवाले', 'काँग्रेस एक भैंस चुरा लेगी' असे विषय ओढूनताणून आणणाऱ्यांच्या अनुयायांना आता काँग्रेसच्या निवडणूक प्रचारावर असत्यकथनाचा आरोप करून स्वत:च्या बचावासाठी संविधानबदलाच्या इराद्याचा इन्कार करण्याची वेळ आल्याचे दिसते. पण अबकी बार ४०० पार ही घोषणा भाजपने दिली की नाही ? इतके पाशवी बहुमत यांना का हवे आहे, हे भाजपच्या एक नव्हे, दोघा नेत्यांनी जाहीरपणे सांगितले होते की नव्हते? संविधान बदलण्यासाठी तरतुदी करायला त्यांना ४००चा आकडा पार करायचा होता, परंतु लोकांनी हा हेतू ओळखून त्यांना गेल्या वेळच्या ३०३ च्या आकड्यापर्यंत तर नेले नाहीच, उलट बहुमताच्या २७२ या आकड्यापेक्षाही कमी जागांवर आणून बसविले. चंद्राबाबू आणि नितीशबाबू यांच्या आधारानेच यापुढे दिवस ढकलावे लागणार आहेत याचा हा त्रागा आहे. याउलट भाजपचा २०१४ नंतरचा पट पाहिला तर असत्य या शब्दाला समानार्थी शब्द म्हणजे भाजप ठरलेला आहे. जगात खोटे बोलणारे दोनच राजकारणी सध्या माध्यम–प्रिय आहेत, त्यांपैकी पहिले स्थान अर्थातच 'एन्टायर पॉलिटिकल सायन्स'मध्ये विशारद असलेल्या



आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे, तर त्याखालोखाल दुसरे स्थान अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे. दोन्ही नेते एकमेकांचे मित्र. 'खोटे बोल पण रेटून बोल' हीच शिकवण दोघेही आपापल्या अनुयायांना देत असतात. अर्थात, भाजप आणि त्याचे पाठीराखे हे एरवीही असत्यकथनाचा आधार घेऊन वेळ मारून नेत असतात, हा अनुभव आतापर्यंत देशाला पुरेशा प्रमाणात आलेला आहे. परंतु 'मोदीजी की ग्यारंटी' म्हणजे तर खोटे बोलण्याची गॅरंटी ठरते आहे. हर खाते में १५–१५ लाख, १०० स्मार्ट सिटी, विदेश से काला धन, किसान की आय दुगनी, एमएसपी की ग्यारंटी, सबको पक्के मकान, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना या साऱ्यांमध्ये आलेले अपयश लपवण्यासाठी किती कसरती कराव्या लागत आहेत, या बाबी केशव उपाध्ये सोयिस्कररीत्या विसरले असतील. हाथरस, मणिपूर तर भाजपला आठवतही नाही. पंतप्रधानपद हे आजही सर्वांच्या आदरास पात्र असलेले घटनात्मक पद आहे, परंतु भाजपचे प्रमुख प्रचारक या नात्याने मोदीजींची रसवंती यंदाच्या लोकसभा निवडणुकीपूर्वी जी काही बरसत होती तिला तोड नाही. राहुल गांधी यांना अदानी–अम्बानी 'टेम्पो भरके' पैसे देताहेत काय, मग राहुल गांधी त्यांच्याविरुद्ध का बोलत नाहीत, असा सवाल याच प्रमुख प्रचारकांनी जाहीर सभेमध्ये केला होता. प्रत्यक्षात राहुल गांधी अनेक सभांमध्ये उद्योगपतींच्या राजकीय साट्यालोट्यामुळे देशाच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल नावे घेऊन बोलत असताना 'राहुलजी अभी ऊन पर नही बोलते' असे म्हणणारे खोटे ठरत आहेत, हे भारतवासींनी पुरेपूर अनुभवलेले आहे. मोदीसाहेबांच्या खोटे बोलण्याच्या या गतीपुढे आपण निवडणूक रोख्यांचा– इलेक्टोरल बॉण्ड्सचा घोटाळा विसरून गेलो आणि त्यांच्या असत्य विधानांवर गप्पा मारायला लागलो, हेही लोकांना आज लक्षात येत असेल. राहुल हे तगडे प्रतिस्पर्धी आहेत, याची जाणीव झाल्याखेरीज मोदी यांनी इतका असत्याधारित प्रचार कदाचित केला नसता. पण मोदीजी ज्यांचा द्वेष करतात त्यांच्याचबद्दल – म्हणजे उदाहरणार्थ, मुसलमानांबद्दल– खोटे बोलतात असेही नाही. वेगवेगळ्या शतकात जन्मलेले संत कबीर, बाबा गोरखनाथ, संत नानक देव एकाच वेळी चर्चा करतात, असेही मोदीच जाहीरपणे सांगतात तेव्हा ते असत्य नाही, इतिहासाचा विपर्यासही नाही, तर मोदीजींचे सत्य मानून घ्यायचे, असा भाजप आणि पाठीराख्यांचा प्रघात असावा. डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्ता गमावली, याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथील पत्रकार खरे खोटे तपासतात. ट्रम्प यांनी चार वर्षांच्या कार्यकाळात ३०,५७३ असत्य विधाने केली म्हणजे रोज सरासरी २१ वेळ ते असत्य बोलायचे, हा हिशेब अमेरिकी पत्रकारांमुळेच जगाला कळला. मात्र आपल्याकडे, मोदी यांची असत्यवाणी होताच जणू दिव्य आकाशवाणी झाल्यासारखे ते सत्यच आहे असे सर्वप्रथम पत्रकार मानतात, नंतर ते पत्रकार लोकांना 'प्राइम टाइम'मध्ये पटवून देऊ लागतात. दुसऱ्या दिवशी ते असत्य अनेक दैनिकांच्या रंगीत आवृत्तीत छापून येते व त्यावर तथाकथित विद्वान चर्चा करू लागतात. एवढे नशीबवान ट्रम्प नाहीत. त्या मानाने ट्रम्प यांचे भारतीय मित्र फार भाग्यवान. मोदीजी एका सभेत ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप करतात त्यांनाच भाजप दुसऱ्या सभेत, जणू न्हाऊमाखू घालून क्लीन चिट देऊन पक्षात घेते, जे घाबरत नाहीत त्यांना तुरुंगात पाठविले जाते– हे सारे जणू सत्यवादी राजकारण म्हणून आपल्याकडे खपून जाते. या राजकारणाला कोणीही अघोषित आणीबाणी म्हणू नका १० दिवसात देशात १५ पूल आणि रस्ते कोसळले आहेत, खचले आहेत– हे सत्य आपण बोलू शकत नाही. कारण ते भाजपनिष्ठांच्या म्हणजेच 'हरिश्चंद्राच्या फॅक्टरी'तून आलेले रुपेरी पडद्यावरले मायावी सत्य नाही!

# लातूरच्या यूनीवर्स इंडिया - या स्टार्टअप ने बियॉन्ड शार्क टँक इव्हेंटमध्ये २ कोटींची निधी उभारला







लातूर –लातूर येथील गेमिंग आणि मनोरंजन क्षेत्रातील बजीलॉजिक इनोव्हेशन्स प्रा लि या नामांकित कंपनी ने ठाणे येथे दि. ६ व ७ जुलै रोजी झालेल्या बियॉन्ड शार्क टँक इव्हेंटमध्ये उल्लेखनीय २ कोटींची निधी उभारली आहे, जी कोणत्याही इतर सहभागी कंपनीने मिळवलेल्या निधी पैकी सर्वाधिक आहे. सदरील निधी ठाणे जिल्हा माहेश्वरी युवा संघठन आणि महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघठन यांच्या सहकार्याने ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात देण्यात आला. परळी येथील निवृत्त जिल्हा न्यायाधीश, कृष्णगोपाल तोतला यांचे चिरंजीव गौरव तोतला आणि मेहुल तोतला हे कंपनी चे संचालक असून सण २०१७ पासून कंपनीच्या युनिव्हर्स या ब्रँड अंतर्गत गेमिंग आणि व्ही आर क्षेत्रात कार्यरत आहेत. बियॉन्ड शार्क टँक इव्हेंटमध्ये २०० अर्जांमधून २० स्टार्टअप्सची निवड करण्यात आली होती. त्यातील ७ स्टार्टअप्सना एकूण ५.५ कोटींची गुंतवणूक मिळाली. या गुंतवणुकीत युनिव्हर्स ने सर्वाधिक २ कोटी चा निधी मिळवला, ज्यामुळे गुंतवणूकदारांचा कंपनीच्या कार्यशैलीवर विश्वास दिसून आला. नामांकित उद्योजक व निवेशक, ज्यांना 'शार्क' म्हणून ओळखले जाते, त्यांनी या कामी महत्त्वाची भूमिका बजावली. युनिव्हर्स कंपनीला मिळालेली मोठी गुंतवणूक आणि गुंतवणूकदारांची रुची हे कंपनीच्या मजबूत व्यवसाय मॉडेलचे आणि उज्ज्वल भविष्याचे संकेत आहेत. संचालक गौरव आणि मेहुल तोतला हे कंपनीच्या यशामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. सात ठिकाणी कार्यरत असलेल्या यूनीवर्स गेम झोनचे देशभर विस्ताराचे नियोजन आहे. कंपनीच्या धोरणात्मक उपक्रमांमुळे आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनामुळे संचालकांचे सर्व स्तरातून व राज्य भरातून अभिनंदन होत आहे.

# केसांना गूळ लावल्याने केस वाढण्यासह होतात नैसर्गिकरीत्या मजबूत? याबाबत डॉक्टर काय म्हणतात घ्या जाणून.



.तुमच्यापैकी अनेक जण केसगळतीवर विविध प्रकारचे उपाय करून पाहतात; पण काहीच फरक पडत नाही. अशा वेळी केसांना गूळ लावल्यास या सर्व समस्यांपासून आराम मिळू शकतो आणि केस निरोगी, मजबूत व अधिक लवचिक होण्यासही मदत होते, असे मानले जाते. याबाबत आहारतज्ज्ञ अदीबा इकराम सय्यद यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे; ज्यात गूळ रात्रभर पाण्यात भिजवत ठेवा आणि सकाळी ते पाणी गाळून घेऊन, केसांवर स्प्रे करा, असा सल्ला दिला आहे. पण, त्यामुळे खरंच केस वाढण्यासह नैसर्गिकरीत्या मजबूत होतात का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याच प्रश्नावर हैदराबादमधील हायटेक सिटी केअर हॉस्पिटल्समधील आहारतज्ज्ञ सादिया यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.आहारतज्ज्ञ सादिया म्हणाल्या की, गूळ हा एक पारंपरिक साखरेचा प्रकार आहे; जो लोह, मॅग्नेशियम व पोटॅशियम यांसारख्या पोषक खनिजांनी समृद्ध आहे. हे पोषक घटक केसांच्या आरोग्यासह संपूर्ण आरोग्यासाठीही फायदेशीर मानले जातात. त्यामुळे रक्ताभिसरण क्षमता सुधारते आणि केसांच्या मुळांमध्ये ऑक्सिजन चांगल्या प्रकारे वितरित होतो. एकंदरीत संतुलित पोषण हे केस मजबूत आणि अधिक लवचिक बनण्यास हातभार लावू शकते. 'या' हार्मोन्समुळे वाढते तुमचा चेहरा अन् पोटावरील चरबी; अतिरिक्त चरबी नियंत्रणात ठेवण्यासाठी काय कराल? डॉक्टरांनी सुचवले 'हे' उपाय गुळामध्ये असलेले पोषक घटक डॉ. सादिया यांनी गुळाच्या पाण्यात कोणते पोषक घटक असतात याविषयी माहिती दिली आहे. १) लोह : योग्य रक्ताभिसरणासाठी आवश्यक असते. त्यामुळे केसांच्या मुळांमध्ये ऑक्सिजन पोहोचवण्यास मदत होते. त्याशिवाय केसांची वाढ होते आणि केस मजबूत होतात. २) मॅग्नेशियम : प्रोटीन आणि ऊर्जा उत्पादनात मदत होते; जे केसांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. ३) अँटीऑक्सिडंट्स : गुळात अँटिऑक्सिडंट्सचे गुणधर्म असतात; जे ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यास मदत करतात. ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे केसांचे नुकसान होते आणि केस गळू लागतात.

# खोपेगाव - वासनगाव शिव रस्ता ७० वर्षांनी होणार मोकळा...

### लवकरात लवकर पूर्ण रस्ता मोकळा करून देणार - तहसीलदार सौदागर तांदळे



लातूर :- लातूर तालुक्यातील मौजे खोपेगाव येथे दिनांक १० जुलै २०२४ रोजी लातूर तहसीलचे तहसीलदार यांनी खोपेगाव - वासनगाव रस्त्याची येऊन पूर्ण पाहणी करून पूर्ण माहिती घेतली तसेच त्यांनी हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण मोकळा करून देणार असे होते गावातील शेतकऱ्यांना दिलासा दिला. यावेळी मंडळाधिकारी शेख रफिक वासनगाव चे तलाठी धनराज गायकवाड दोन्ही गावचे पोलीस पाटील व दोन्ही गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते. मौजे खोपेगाव येथील शेतकऱ्यांना अनेक दिवसांपासून रस्ता नसल्यामुळे खूप त्रास सहन करावा लागत होता , त्यांना शेताकडे जा येण्यासाठी व शेतातल्या मालवाहतुकीसाठी पावसाळ्यामध्ये अनेक अडचनीना सामोरे जावे लागत होते त्यामुळे खोपेगावातील शेतकऱ्यांनी बरेच दिवसापासून लातूर तहसीलला निवेदन अर्ज देऊन पाठपुरावा केला या पाठपुराची दखल घेऊन लातूर तहसीलचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी आज खोपेगाव - वासनगाव शिव रस्त्याची प्रत्यक्ष येऊन पाहणी केली तसेच तलाठी मंडळ अधिकारी पोलीस पाटील व इतर सर्व कर्मचारी व नगरचनाकार , मोजणी ऑफिसच्या सर्व कर्मचाऱ्यांना या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशा सूचना दिल्या व शेतकऱ्यांना शब्द दिला की मी स्वतः विशेष लक्ष देऊन या रस्त्याचे काम आज पासून सुरू झाले व हे काम पूर्ण होईपर्यंत सुरूच राहणार व हे काम आठ पंधरा दिवसात पूर्ण करून हा रस्ता पूर्ण मोकळा करून देणार असे तहसीलदार यांनी शेतकऱ्यांना विश्वास दिला यामुळे सर्व शेतकऱ्यांनी तहसीलदार यांचे आभार मानले.




# जय तुळजाभवानी नगरातील नागरिकांच्या मागणीला उपायुक्त शुभम क्यातमवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

### स्थळ पाहणीचे दिले निर्देश देऊन कंपाउंडचे चालू असलेले काम थांबविण्याचा दिला शब्द

लातूर : येथील जय तुळजाभवाणी नगरातील रिंगरोडला जोडणारा रस्ता संबंधीत जागा मालकाने अडवील्यामुळे रहदारीस गैरसोय होत आहे. सदरील रस्ता सलग करुन द्यावा व संबंधीत जागा मालकाने चालू केलेले कंपाउंडचे काम थांबवावे यासाठी जय तुळजाभवाणी नगरातील नागरिकांनी बुधवार (दि.१०) रोजी लातूर शहर महानगर पालिकेत जाऊन उपायुक्तांची भेट घेऊन निवेदन दिल. यावेळी उपायुक्त शुभम क्यातमवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत नागरीकांना रहदारीसाठी रस्ता देण्याचा शब्द दिला. तसेच कंपाउंडचे चालू असलेले काम थांबवीण्याचे संबंधीत जागा मालकास निर्देश ही दिले. जय तुळजाभवानी नगरात साधारणपणे पाचशे ते सातशे नागरिक अनेक वर्षापासून राहतात. तुळजाभवानी नगर हे खाडगाव येथील सर्वे नं. ८४/१/ब मधील वसाहत असून सदर नगरचे पश्चिम बाजूस खाडगाव सर्वे नं. ८४ व ८२ हे सर्वे असून सदर गट जमीनीचे मालक हे त्यांच्या ८५ आर जमीन जी रिंग रोड लगत असून त्यावर नविन प्लॉटींग टाकत आहेत. त्याची २०-२ लेआऊट नं. ५५६७५ ऊऊह्चउ२०२४००२० दि. ६ मार्च २४ अन्वये मंजूर झालेला आहे. सदर प्लॉटींग टाकत असताना जय तुळजाभवानी नगर मधून पश्चिम बाजुस रिंग रोडकडे जाणारा रस्ता त्यांनी एक ग्रीन बेल्ट टाकून त्यांनी टाकलेला रस्ता ४० फुटाचा टाकला असून तो रस्ता रिंग रोड लगत रस्ता आहे. तुळजाभवानी नगर मधुन जाणारा रस्ता हा त्यांच्या ४० फुट रस्त्याशी न जोडता मध्ये एक ग्रीन बेल्ट टाकून रस्ता बंद केला आहे. तसेच सदर जागा मालकाने कंपाऊंड बांधकाम करत आहेत. यामुळे तुळजाभवानी नगरातील रहिवाशी यांना रहदारीस अडथळा निर्माण झाल आहे. तुळजाभवानी नगरात सुमारे ४०० ते ५०० नागरीक राहतात यांना रिंग रोडकडे जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. सदरील बाब लातूर मनपा उपायुक्त क्यातमवार यांच्या लक्षात आणुन देण्यासाठी जय तुळजाभवानी नगरातील सुमारे शंभर महिला व नागरीक यांनी लातूर मनपात जाऊन उपायुक्त यांची भेट घेऊन सदरील रस्ता सलग करुन द्यावा व संबंधीत जागा मालकाने चालू केलेले कंपाउंडचे काम थांबवावे यासाठी निवेदन दिले. यावेळी उपायुक्त क्यातमावर यांनी सर्व नागरीकांचे म्हणने ऐकुन घेऊन नागरीकांना रस्ता देण्याचे मनपाचे काम आहे असे सांगुन नगर रचना कार्यालयातील कर्मचाऱ्याला समक्ष बोलावून स्थळ पाहणी करुन अहवाल देण्याचे निर्देश दिले. तसेच संबंधीत जागा मालक व कॉन्ट्राक्टर यांनी चालू केलेले कंपाऊडचे बांधकाम थांबविण्याचे निर्देश दिले. यावेळी मनपा उपायुक्त क्यातमवार यांनी तातडीने दखल घेऊन नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्परता दाखवल्या बद्दल जय तुळजाभवानी नगरातील नागरीकांनी उपायुक्तांचे आभार मानले. यावेळी सचिन गांगले, अरुण साळुंके, राहुल चव्हाण, राजु गायकवाड, अडे सर, सगरे सर, शिंदे, साळुंखे, रोळे, जाधव, सकरेवार, गरड यांच्यासह जय तुळजाभवाणी नगरातील महिला व पुरुष यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# तुम्हाला पावसाळ्यात भाजलेले कणीस खायला आवडते का? त्याचे ५ सर्वोत्तम फायदे जाणून घ्या



पावसाळ्याचे आगमन होताच आपल्या मनात एक विशेष आनंदाची आणि उत्साहाची भावना निर्माण होते. हिरवीगार माती, थंडगार वारा आणि रिमझिम पावसाचा आनंद वेगळाच असतो. पण या हंगामातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे भाजलेले कणीस !गरमागरम, बटर लावलेले, भाजलेले कणीसची चव सर्वांनाच आवडते. पण तुम्हाला माहीत आहे का की हे स्वादिष्ट कणीस केवळ चवदारच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहेत.

१. फायबरचा खजिना: भाजलेले कणीस फायबरचा उत्तम स्त्रोत आहे. फायबर पचन सुधारते, बद्धकोष्ठता दूर करते आणि वजन नियंत्रित करण्यास मदत करते.


२. जीवनसत्त्वे आणि खनिजे समृद्ध: कणीस मध्ये भरपूर जीवनसत्त्वे अ, सी, ई, के, बी कॉम्प्लेक्स आणि मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह यांसारखी खनिजे असतात. हे पोषक घटक रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास, हाडे मजबूत करण्यास, रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि ऊर्जा पातळी राखण्यास मदत करतात.३. अँटिऑक्सिडंट्स भरपूर: भाजलेले कणीस देखील अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असते. अँटिऑक्सिडंट्स शरीराला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवतात, ज्यामुळे कर्करोग, हृदयरोग आणि इतर आरोग्य समस्या टाळण्यास मदत होते. ४. हृदय निरोगी ठेवते: कणीस मध्ये असलेले फायबर आणि पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. कणीस मध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी सिड हृदयाला निरोगी ठेवण्यास मदत करतात.

५. मेंदूसाठी फायदेशीर: कणीस मध्ये असलेले व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स मेंदूची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते. हे जीवनसत्त्वे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि तणाव कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहेत.

भाजलेले कणीस कसे खावे? भाजलेले कणीस तुम्ही अनेक प्रकारे खाऊ शकता. तुम्ही ते लोणी, मीठ, मिरची किंवा इतर मसाल्यांसोबत खाऊ शकता. तुम्ही सलाडमध्येही याचा समावेश करू शकता.

लक्षात ठेवण्याच्या गोष्टी: भाजलेले कणीस जास्त तेलात तळू नये. तुम्हाला कोणतीही ऍलर्जी असल्यास,कणीस खाण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. जास्त कणीस खाऊ नका, कारण त्यामुळे पोटात गॅस किंवा अपचन होऊ शकते. पावसाळ्यात भाजलेले कणीस चाखणे हा एक उत्तम अनुभव असतो. हे स्वादिष्ट आणि आरोग्यदायी अन्न तुमच्या शरीराला आवश्यक पोषक तत्वे पुरवते आणि तुम्हाला निरोगी ठेवते. तर या पावसाळ्यात गरमागरम भाजलेल्या कणीसचा आस्वाद घ्या आणि आरोग्याची काळजी घ्या!

# गाझावर इस्त्रायलचा एअर स्ट्राईक; २९ जणांचा मृत्यू



उत्तर गाझा : इस्त्रायली सैन्याने गाझामधील एका शाळेवर एअर स्ट्राईक केला आहे. यामध्ये २९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. एजन्सी एएफपीनुसार, एका आठवड्यातील हा दुसरा हल्ला आहे, ज्यामध्ये शाळेला लक्ष्य करण्यात आले आहे. ज्या शाळेत हा हल्ला झाला तेथे निर्वासितांना ठेवण्यात आले होते.गेल्या चार दिवसांपासून निर्वासितांना ठेवण्यात आलेल्या अशा ठिकाणांवर इस्त्रायल हल्ले करत आहे. इस्त्रायल शाळा आणि रुग्णालयांवरही हल्ले करत आहे. याआधी शनिवारी इस्त्रायली लष्कराने गाझामध्ये हवाई हल्ला केला होता. या हल्ल्यात १६ जणांचा मृत्यू आणि ७५ हून अधिक लोक जखमी झाले होते. ही शाळा संयुक्त राष्ट्रांची होती, जिथे निर्वासितांना ठेवण्यात आले होते.संयुक्त राष्ट्राने याला धोकादायक पाऊल म्हटले आहे. खान युनिसमधून लोकांना बाहेर काढण्यासाठी आणखी वेळ द्यावा असेही म्हटले आहे. या काळात इस्त्रायलने निर्वासितांवर हल्ले करू नयेत. इस्त्रायली लष्कराने पॅलेस्टिनींना खान युनिस रिकामे करण्याचे आदेश दिले आहेत. यानंतर तेथील तीन मोठी रुग्णालये बंद करण्यात आली आहेत.

# किनवट तालुक्यात रानभाज्यांचा हंगाम सुरु



किनवट/शेख शौकत :-किनवट हा जंगल डोंगर रानमाळाने व्यापलेला परिसर असल्याने पावसाळ्याची सुरुवात झाली की, रानभाज्याच्या हंगामाला सुरुवात होते. शेतीच्या बांधावर धुऱ्यावर, नदी नाल्याच्या कडावर, जंगलात, डोंगरावर मोठ्या प्रमाणात रानभाज्या उपलब्ध होतात. त्यामुळे शेतमजुरांनाही रोजगार उपलब्ध होत असतो. मोठ्या प्रमाणात डोंगर, जंगल, नदी, नाले व्यापलेला तालुका म्हणून किनवटची ओळख आहे. या सर्व जंगलामध्ये विविध जातीच्या रानभाज्याची उगवण होते. पहिल्या पावसाला सुरुवात झाली की, रानभाज्या निघायला सुरुवात होते व त्या भाज्या जमा करून ग्रामीण भागातील शेतमजूर, महिला भाज्या आपल्या गावामध्ये, शहरांमध्ये विक्रीसाठी घेऊन फिरतात. त्यात रानभाज्यात खास करून हडसन हे हाड जोडीसाठी महत्त्वाची रानभाजी म्हणून तिची ओळख आहे. रानचमकुरा, चितरंगीची भाजी, घोळ, करंजी, राजगिरा, कोल्लारी, करटुले, चवळा भाजी, अंबाडीची भाजी या विविध भाज्यासह अधिक गुणकारी म्हणून व दोन पानाचा उगवलेला तरोट्याच्या भाजी अधिक गुणकारी औषधी म्हणून तरोट्याच्या भाजीचा उपयोग केला जातोय. सर्व रानभाज्या शहरी व ग्रामीण भागातील लोक आवडीने खातात. शहर व तालुक्यातल बाजारपेठेत पावसाळ्यात लोक हौशीने रानभाज्या खरेदी करून लोक खातात. राजभाज्या खाण्यातून अनेक आजार कमी होतात असे बोलले जात आहे. या भाज्या गुणकारी औषधी प्रमाणे असल्याने त्याचा वापरही वाढत चालला आहे.

# तुषारचा हिस्सा नऊ महिन्यांपासून थकला : शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी

## केंद्र शासनाची पंतप्रधान कृषी सिंचन योजना ठरू लागली फोल?

पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्याला ८० टक्के तर मोठ्या शेतकऱ्याला ७५ टक्के अनुदान दिले जाते. त्यात राज्य शासनाचा ६ हजार ४८ रुपये हिस्सा तर केंद्र शासनाचा १३ हजार ३०३ रुपये हिस्सा आहे. राज्य शासनाने आपला हिस्सा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला आहे. मात्र केंद्र सरकारने अद्यापही त्यांचा १३ हजार ३०६ रुपयांचा हिस्सा जमा केलेला नसल्याने स्व गुंतवणूक करणारे शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.



किनवट/शेख शौकत :-पंतप्रधान कृषी सिंचन योजनेचा तुषार ठिबकचा केंद्र शासनाचा हिस्सा गत आठ, नऊ महिन्यांपासून लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमाच झाला नाही. त्यामुळे या योजनेसाठी स्व गुंतवणूक करणारे ६०० शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. दिवसेंदिवस पाऊस कमीच होत चालला आहे. त्यामुळे सिंचनाखालील लागवडी योग्य क्षेत्र वाढवणे, पाण्याचा अपव्यय टाळण्यासह जल वापर क्षमतेमध्ये वाढ करणे, अचूक सिंचन आणि तुषार व ठिबक सिंचन अशा पाणी वाचवणाऱ्या सिंचन पद्धतीच्या वापरात वाढ करणे हा पंतप्रधान कृषी सिंचन योजनेचा उद्देश असला तरी २०२३-२४ या वर्षात राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा आठ ते नऊ महिन्यांपासून केंद्र सरकारचा १३ हजार ३०६ रुपयांचा हिस्सा थकलेलाच असल्याने स्वगुंतवणूक करणारे अल्पभूधारक व मोठे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या योजनेचा लाभ घेणारे शेतकरी ठिबक व तुषार संच घेण्यासाठी पदरमोड करतात संच बसवल्यानंतर कृषी विभागाच्या वतीने तपासणी केली जाते. त्यानंतर अनुदान खात्यावर पडते. आज आठ ते नऊ महिने झाले तरी पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या अनुदानाचा हिस्सा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमाच झाला नसल्याने उसनवारी करून संचाची खरेदी करणारे लाभार्थी शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने हा हिस्सा केंद्र शासनाने वेळीच जमा करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. १३ हजार ३०६ रूपयांचा हिस्सा मिळाला नाही

# शेतकरी झाला त्रस्त वन्यप्राण्यांकडून कोवळी पिके फस्त

### शेतकऱ्यांना करावी लागते जागल

महागा-मोलाचे बियाणे शेतकऱ्यांनी जमिनीत पेरले आहे. आता उगवण झालेली पिके वन्य प्राणी तुडवून पिकांचे नुकसान चालविले आहे. पीक वाचविण्यासाठी दिवसरात्र शेतकऱ्यांना आपल्या शेतात काढावी लागत आहे, तरीही वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या शेतात शिरून कोवळी पिके तुडवून नाश करू लागले आहेत.

### पेरणी केलेल्या बीजांकुराचे नुकसान

तालुक्यातील कुपटी परिसरामध्ये खरिपाच्या पेरणीतील बीजांकुराना वन्य प्राण्यांकडून धोका निर्माण झाला आहे. उगवलेल्या पिकाची नासाडी वन्य प्राण्यांकडून होत आहे. कुपटी परिसर हा डोंगराळ भाग असून, काही शेतकयांची ४० टक्के शेती पाण्याखाली आहे. उर्वरित शेतीही कोरडवाहू आहे. शेतकऱ्याना खरीप पिकावरच वर्षभराची तजवीज करावी लागते. मात्र, उगवलेल्या पिकांना सांभाळण्याची कसरत शेतकऱ्यांना करावी लागत आहे.

बोधडी/प्रतिनिधि :-किनवट तालुक्यात जंगलाशेजारी असलेल्या शेतात वन्य प्राण्यांचा मुक्त संचार वाढला आहे. शेतकऱ्यांना बियाणे पेरल्यापासून ते पीक हातात येईपर्यंत शेतातच जागल करावी लागत आहे. वनविभागाने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेच्या अंतर्गत शेताला - कुंपण योजना राबवावी, अशी मागणी त्रस्त शेतकऱ्यांची होत आहे. किनवट हा तालुका जंगलाने व्यापलेला असून बहुतांश शेती ही जंगलाला लागून आहे. त्यामुळे हरीण, नीलगाय, रोही, रानडुक्कर व इतर वन्य प्राण्यांचा धुमाकूळ सुरू आहे. शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी रात्र रात्र जागरण करावे लागत आहे. सध्या पेरण्या झाल्या असून वन्य प्राणी जंगलाशेजारी असलेल्या शेतात घुसून पिकांची नासाडी करू लागले आहेत. आधीच पाऊस अत्यंत कमी प्रमाणात आहे. त्यात प्राण्यांचा त्रास होत आहे. वनविभागाने बंदोबस्त करावा तालुक्यातील गडगा परिसरात हरिण, मोर, रानडुक्कर, वानर यांचा उपद्रव प्रचंड प्रमाणात वाढला आहे. कोवळ्या मोडावर हे वन्यप्राणी तुटून पडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना हरिण, वानर यांच्या उपद्रवातून दिवसभर तर रानडुकरांच्या नासाडीपासून अंधाऱ्या रात्री पिके वाचविण्यासाठी जीव धोक्यात घालून जागरण करावे लागत आहे. शासनाने वनविभागाला वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आदेश द्यावेत, अशी मागणी गडगा, मांजरम, नावंदी, आलूवडगाव, टेंभुर्णी, केदारवडगाव आदी गावांच्या शेतकऱ्यांनी केली आहे. वानराच्या कळपात ४०-५० वानरे तर ५० ते ६० हरणांचा एक कळप याप्रमाणे २० ते २५ कळपांचा वावर एकट्या गडगा शिवारात दिवसरात्र कोवळ्या पिकांवर तुटून पडत आहे.

# नेरुळ जयंती उत्सव समितीच्या वतीने १० व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार व जयंती अव्हाल सादर





नवी मुंबई / के. एच. हनवते :- नेरूळ जयंती उत्सव समितीच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत सुयश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा गुणगौरव करून जाहीर अभिनंदन केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस योग्य दिशा देण्यासाठी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज वडाळा मुंबई प्राचार्या डॉ. वराळे मॅडम त्याचबरोबर एसएनडीटी कॉलेजच्या सीनियर प्राध्यापिका डॉ. सौ तायडे मॅडम यांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांना भविष्यात गगन भरारी घेण्यासाठी मान्यवरांच्या मार्गदर्शनाची संधी सुद्धा प्राप्त करून दिली. याबद्दल नेरूळ जयंती उत्सव समितीचे सर्व अग्रणी मंडळाचे पदाधिकारी, व सदस्य यांच्या कार्याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. गुण गौरव केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वतीने जयंती उत्सव कमिटीला मनापासून खूप खूप धन्यवाद वेक्त करण्यात आले. अतिशय स्तुत्यपुरण उपक्रम आपण राबवलेला आहे. भविष्यात असेच आपल्या सत्कार्याचा लौकिक वाढत राहो. नवा आदर्श युवा वर्गासमोर आपण ठेवलेला आहे. पुनश्च एकदा सर्व गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्याची गावपातळीवर सुविधा

लातूर : - राज्यातील मुली व महिलांसाठी सुरु करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या महत्वाकांक्षी योजनेसाठी अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज केलेल्या लाभार्थ्यांनाही १ जुलै २०२४ पासूनच लाभाची दरमहा १ हजार ५०० रुपये रक्कम दिली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांचे अर्ज भरून घेण्यासाठी प्रशासनामार्फत गाव पातळीवरही सुविधा उपलब्ध करून दिली असून ग्रामस्तरीय समिती स्थापन केली आहे. त्यामुळे महिलांनी एकाच वेळी गर्दी न करता टप्प्या-टप्प्याने आपले अर्ज सादर करावेत. तसेच एकदा अर्ज भरल्यानंतर पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यासाठी 'नारीशक्ती दूत-छ्रीळीहरझीेंळ वीं' हे मोबाईल प डाऊनलोड करून वैयक्तिक अर्जदार ऑनलाईन अर्ज भरू शकणार आहेत. तसेच महा ई-सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र याठिकाणी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही नियमितपणे सुरु राहणार असल्याने महिलांनी एकाच वेळी गर्दी न करता आपले अर्ज भरावेत. प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरून घेण्यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे जिल्हास्तरावर संनियंत्रण केले जाणार आहे. यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद आणि महापालिका स्तरावर झालेली ऑनलाईन नोंदणी, महा ई-सेवा केंद्र तथा आपले सरकार सेवा केंद्रातून भरण्यात आलेल्या अर्जांचा आढावा घेतला जाणार आहे.

राज्यातील महिला व मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, त्यांच्या सशक्तीकरणास चालना देण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेमध्ये २१ ते ६५ वर्षे वयोगटातील आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपर्यंत असलेल्या महिलांना या योजनेंतर्गत दरमहा १ हजार ५०० रुपये दिले जाणार आहेत. एका कुटुंबात जास्तीत जास्त दोन महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. विवाहित, घटस्फोटीत, विधवा, परितक्त्या, निराधार, कुटुंबातील एक अविवाहित महिला या योजनेसाठी पात्र आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आधारकाड अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म नोंदणी प्रमाणपत्र अथवा महिलेचे १५ वर्षांपूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक. उत्पन्नाचा दाखला अथवा पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड, अर्जदाराचे विहित नमुन्यातील साध्या कागदावरील हमीपत्र, बँक पासबुक, अर्जदाराचा फोटो, महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचे अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला. गावपातळीवर अर्ज स्वीकारण्यासाठी समिती; यादीचे होणार चावडी वाचन या योजनेचे अर्ज शहरी भागात वार्ड स्तरावर आणि ग्रामीण भागात गाव पातळीवर स्वीकारण्यासाठी समिती गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण भागात संबंधित गावातील ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, बचतगटाच्या महिला, आशा सेविका यांच्यामार्फत महिलांना आपले अर्ज ऑफलाईन स्वरुपात सादर करता येणार आहेत. त्यानंतर हे अर्ज ऑनलाईन भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी बँक खात्याला आधार क्रमांक सलंग्न असणे आवश्यक आहे. तसेच ऑफलाईन अर्ज सादर करताना योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडणे गरजेचे आहे. ऑफलाईन अर्जाचा नमुना मोफत उपलब्ध करून दिला जाणार असून ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. ऑफलाईन अर्ज छाननी करून अपलोड करण्यासाठी तलाठी यांच्या अध्यक्षतेखाली गावपातळीवर समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये आशा सेविका, उमेदच्या सीआरपी, माविमच्या सहयोगिनी सदस्य असून ग्रामसेवक सदस्य सचिव असतील, तर अंगणवाडी सेविका सहसचिव राहतील. एकदा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर महिलांना पुन्हा अर्ज सादर करण्याची गरज नाही. प्राप्त अर्जांची यादी तयार करण्यात येणार असून तिचे प्रत्येक बुधवारी व शनिवार चावडी वाचन करण्यात येणार आहे. यावेळी यादीवर हरकती मांडता येणार आहेत. योजनेची माहिती देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर मदत कक्ष मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्याची कार्यवाही जिल्ह्यात राबविण्यात येत असून या योजनेची अचूक माहिती लाभार्थ्यांना देण्यासाठी तालुका, जिल्हास्तरावर मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तालुकास्तरावर तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगरपरिषद तथा नगरपंचायत याठिकाणी, तसेच जिल्हास्तरावर महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात मदत कक्ष राहणार आहेत. तसेच १८१ या टोल फ्री क्रमांकावर किंवा ०२३८२-२९९६८० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधून या योजनेची अधिक माहिती प्राप्त करून घेता येईल, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# वंचित बेलापूर विधानसभा निवडणूक संदर्भात महत्त्वपूर्ण मिटींग वाशी येथे संपन्न



नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक :०७/०७/२०२४ रोजी वंचित बहुजन आघाडी बेलापूर विधानसभेच्या वतीने नवीन तालुका कार्यकारणी पदाधिकारी निवडी संदर्भात वंचित बहुजन आघाडी ची महत्त्वपूर्ण बैठक नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलीप (भाई) बंदीचोडे यांच्या उपस्थितीत वाशी नवी मुंबई येथील शिरसागर हॉटेल येथे पार पडली. अगामी विधानसभा निवडणुक डोळ्यासमोर ठेवून लवकरच बेलापूर तालुका कार्यकारणी, विभाग, वार्ड, व बुथ कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे व वंचित चा नवी मुंबई कार्यकर्ता मेळावा लवकरच घेण्यात येईल आसे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष बंदीचोडे यांनी जाहीर केले आणि त्या संदर्भात कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे आसे ही म्हणाले. तसेच बैठक संपल्या नंतर बेलापूर तालुका वंचित चे धडाडीचे कार्यकर्ते मा. उपाध्यक्ष तथा पत्रकार आयु. कल्याणराव हनवते यांना वाढदिवसानिमित्त सर्व पदाधिकारी यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांना पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलीप (भाई) बंदीचोडे यांच्या सह राहुल जाधव, सुनील भोले, गौतम चव्हाण, दिपक गायकवाड, हेमंत दिवेकर, कल्याणराव हनवते,



सतीश खंडाळे, सुभाष बलखंडे, ज्ञानेश्वर जाधव, भागीराम साळवे, राहुल सिरसाट, कलीम खान, सतीश आढुळे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE